डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथील मानव्य विद्याशाखेतील राज्यशास्त्र व लोकप्रशासन या विषयातील सादर पीएच. डी. प्रबंधाचे उल्लेख विश्लेषण

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या आंतर विद्याशाखीय अंतर्गत ग्रंथालय आणि महितीशास्त्र विषयातील पीएच. डी. पदवी च्या अंशत: पूर्ततेसाठी सादर केलेला संशोधन आराखडा

संशोधक

निखाते प्रियंका दत्तराम

मार्गदर्शक

डॉ. एस. जी. क्षीरसागर

ग्रंथपाल

ग्रामीण महाविद्यालय वसंत नगर

ता. मुखेड जि. नांदेड

माध्यमशास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

डिसें-2020

प्रस्तावना :-

एकविसाव्या शतकातील भारताची विकसनशील देश अशी वाटचाल संपत आहे व तो एका नव्या विकासाकडे वाटचाल करत आहे. भारताची ही विकासाकडे जाणारी वाटचाल माहिती व ज्ञानाच्या मजबूत पायातून झालेली आहे. हा मजबूत पाया उभारण्यात ग्रंथालय व ग्रंथांची भुमिका ही अनन्य साधारण आहे. ग्रंथालय ही चळवळ आता गावोगावी पोहचली आहे. ग्रंथालयांच्या माध्यमातून प्रगत व सुजाण भारतीय समाज तयार होत आहेत. त्यामुळे आज घडीला आपण ग्रंथालयच चिकित्सक पद्धतीने अभ्यास करणे ही काळाची गरज बनली आहे. कारण अशा चिकित्सक विवेचांनातून भविष्यातील उज्ज्वल भारतासाठी आवश्यक असे इंधन ग्रंथालयामार्फत मिळू शकेल.

Bibliometrics ही संकल्पना अगदी अलीकडेच अस्तित्वात आली आहे. गेल्या 50 वर्षात ग्रंथालय व महितीशास्त्रात एक वेगळा दृष्टीकोण पुढे आला आहे. यामुळे ग्रंथालयात येणारे ग्रंथ आणि ग्रंथेत्तर साहित्यात झालेल्या विशिष्ट विषयाचा प्रकाशन विस्तार, लेखकाच्या संदर्भ निर्मितीच्या रीती, लेखकांचे लेखनातील उत्तरदायित्व (Authorship pattern), ग्रंथालयाचा उपयोग करण्याची कार्यपद्धती आणि त्यामुळे त्यांच्या निर्माण होणाऱ्या माहितीविषयक गरजा या सर्वाचा संख्यात्मक अभ्यास इ. स. 1948 पासून मोठ्या प्रमाणावर करण्यात आला. संशोधनाच्या या प्रक्रियेतून काही नवीन सिद्धांताची निर्मिती झाली. ब्रॅडफर्ड यांनी मांडलेल्या विषय विस्तार सिद्धांताच्या अनुषंगाने ग्रंथालय व माहितीशास्त्र बिब्लिओमॅट्रिकस (Bibliometrics) तंत्राची निर्मिती झाली. Bibliometrics या तंत्राद्वारे ग्रंथालय व ग्रंथालयीन साहित्य यांचे मोजमाप

अतिशय सोप्या पद्धतीने केले जाते. या तंत्राचा उपयोग राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर विषयाचा विस्तार मोजण्यासाठी मोठया प्रमाणात केल्या जात आहे.

उल्लेख विश्लेषण (Citation Analysis):-

संशोधन करताना आपल्या अगोदर संशोधकांच्या व संशोधांनाचा आधार घेत त्या संदर्भाचे उल्लेख संशोधनात करताना वेगवेगळ्या लेखातील सर्व उल्लेखाची शेवटी संदर्भ सुची दिली जाते. त्या सूचीच्या आधारे मांडणी कराची असते. Bibliometrics म्हणजे ग्रंथमिती किंवा ग्रंथाचे मापन होय. या शब्दाची उत्पत्ती लॅटिन भाषेपासून झाली. हा Biblio आणि Metric म्हणजे या दोन शब्दापासून बनला आहे. Biblio म्हणजे ग्रंथ आणि metrics म्हणजे ग्रंथाचे मापन होय. Bibliometrics या संज्ञेचा उपयोग सर्वप्रथम पिचर्ड यांनी 1969 मध्ये केला. Journal of Documentation मधील आपल्या लेखात त्यावेळी रूढ असलेल्या Statistical Bibliographyया संज्ञेच्या जागी त्यांनी हा शब्द वापरला.

Bibliometrics पद्धती ही संदर्भ उल्लेख विश्लेषण म्हणजे Citation Analysis आशय विश्लेषण अशा दोन पद्धतीद्वारे वापरली जाते. Bibliometrics पद्धतीचा वैज्ञानिक संशोधन, पर्यायाने संशोधनपर साहित्याचा सांख्यिकी अभ्यासासाठी नेहमीच वापर होतो. Bibliometrics या पद्धतीच्या वापरात सर्व शोध आणि संशोधनाचे निष्कर्ष हे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या नियतकालिकामध्ये प्रकाशित केले जातात. असे साहित्य संशोधक त्यांच्या लिखाणात वापरलेल्या साहित्याचा संदर्भ म्हणून उल्लेख करतात. एखादा संदर्भ उल्लेख वारंवार होणे त्या लेखांचा वैज्ञानिक समुहावरील प्रभाव स्पष्ट

करतो. तसेच संशोधनपर लेख लिहिताना लेखक इतर लेखकांच्या साहित्याचा संदर्भ महून उल्लेख करतात. त्यास Citation Analysis असे म्हणतात.

उल्लेख विश्लेषणाची व्याख्या :

- संशोधन लेख लिहिताना इतर लेखकांच्या साहित्याचा संदर्भ म्हणून उल्लेख करतात त्यास Citation म्हणतात.
- संशोधन करताना संशोधकाने जर विद्वान लेखकाचा लेख आपल्या संशोधनात लिहिलातर त्याचा संदर्भ देण्याचा पद्धतीला Citation असे म्हणतात. ते लेखाच्या खाली किंवा प्रकरणाच्या शेवटी दिलेले असतात.

संशोधन विषयाची निवड:

संशोधन विषयाची निवड ही नेहमी एखाद्या समस्येतून होत असते. तसेच त्या विषयाची वास्तविकता व त्या विषयी सद्यस्थिती अभ्यासणे गरजेचे वाटते. माहिती ही खूप मोठ्या प्रमाणात आपल्या समोर असते. त्यातून विविध विषयाची जर्नल, पेटंट, प्रमाणके, गॅझेट इ. वापर संशोधन करताना कितपत व किती प्रमाणात होतो. व त्यातील सुक्ष्मबाबी तसेच साधने तपासून घेण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथील मानव्य विद्द्याशाखेतील राज्यशास्त्र व लोकप्रशासन या विषयातील सादर पीएच. डी. प्रबंधाचे उल्लेख विश्लेष**ण** करणे हा विषय प्रस्तुत संशोधानासाठी निवडला आहे.

Citation analysis of Political Science and Public Administration Ph.D thesis under the faculty of Humanities submitted to Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad.

संशोधनाची उद्दिष्टे :-

कोणतेही संशोधन कार्य करीत असताना संशोधक काही उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून संशोधन कार्य करीत असतो. संशोधनास योग्य दिशा मिळावी व संशोधन हे हेतुपूर्ती करिता असावे असे अपेक्षित असते. यासाठी संशोधकाने प्रस्तुत संशोधनासाठी खालील उद्दिष्टे निर्धारित केलेली आहेत.

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील मानव्य विद्याशाखे अंतर्गत सादर केलेल्या राज्यशास्त्र व लोकप्रशासन या विषयावरील पीएच. डी. प्रबंधाचे ग्रंथसुचीय व विषयाप्रमाणे विश्लेषण करणे.
2. संदर्भित प्रलेखाचे प्रकार (फॉर्मनुसार) शोधणे.
3. संदर्भित प्रलेखाचे कालक्रमानुसार विभागणी करणे.
4. एकाच लेखकांनी लिहीलेल्या लेखांची किंवा पुस्तकांची वारंवारिता काढणे.
5. सदर्भित मासिके आणि पुस्तकांची क्रमवारीता अभ्यासाने.
6. भारतीय व परदेशातील उद्धरणांचे/ उल्लेखांचे वर्गीकरण करणे.
7. छापील ग्रंथ आणि ई-स्त्रोत वापराचे विश्लेषण करणे.

गृहीतके (Hypotheses):

परिकल्पना हे संशोधनाचे केंद्रबिंदू असते. संशोधन करण्यापुर्वी जी संभाव्य उत्तरे गृहीत धरली जातात त्यास गृहीतकृत्ये संबोधले जातात. गृहीतके हे संशोधनाला गती देण्याचे काम करतात. संशोधकानी प्रस्तुत शोध प्रबंधासाठी खालील परीकल्पना निश्चित केल्या आहेत.

1. संशोधक जास्तीत जास्त भारतीय प्रकाशनाची ग्रंथ वापरतात.
2. पुरुष संशोधक त्यांच्या विषयक्षेत्रात महिला संशोधकांपेक्षा प्रबळ आहेत.
3. बहूलेखका पेक्षा एक लेखक असणारे वचन साहित्य जास्त प्रमाणात उपलब्ध आहेत.
4. संशोधकासाठी मराठी भाषा ही प्रभावी व प्रबळ आहे.

संदर्भित साहित्याचा आढावा (Review of related literature):-

संदर्भ साहित्याचा आढावा हा जुन्या साहित्याचा नव्या संदर्भात अभ्यास करण्यासाठी उपयुक्त असतो. त्यामुळे संशोधकाला नव्या जगातील नवी परिस्थिती लक्षात येते. अभ्यास विषयाकडे नव्या दृष्टीने पाहता येते. संशोधनासाठी घेतलेला नवीन विषय प्रत्यक्ष -अप्रत्यक्षरित्या पुर्वी झालेल्या संशोधनाशी निगडीत असतो. त्यामुळे संशोधन कर्त्याने निवडलेला विषय विषयक्षेत्राशी संबधित साहित्याचे वाचन व मनन हा संशोधनातील एक महत्त्वाचा भाग असतो.

कुलकर्णी ए.पी. (2009):- “Indian of Pharmaceutical Education and Research (1996-2006) a Bibliometric Analysis”, पी. राजेंद्र (2005):- “Bibliometric analysis of fiber optics literature”, V.B.(2017) “Citation Analysis of Ph. D. Theses on Mathematics and Statistics submitted to Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad”, जाधव वंदना शेषराव (2015):- “Citation Analysis of Ph. D. Theses on Physical Sciences submitted to Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Aurangabad”, डोंगरे सुदेश नचिकेत (2016):- “Citation Analysis of Current Science Journal”.

संशोधन आराखडा (Research Design):-

संशोधन विषयासंबंधित कार्याची योजना आखणे म्हणजे संशोधन आराखडा होय. संशोधन आराखडयाचे प्रत्येक संशोधनासाठी विशेष महत्त्व असते. संशोधन आराखडयाशिवाय वस्तुनिष्ठ संशोधन करणे अशक्य असते. महणून संशोधन विषयाच्या अनुषंगाने संशोधन आराखडा निश्चित केला जातो. संशोधन आराखडा हा कार्यप्रणालीचा एक अविभाज्य घटक असतो. त्यात तथ्य संकलन व तथ्य विश्लेषण समाविष्ट केले जाते. या अनुषंगाने प्रस्तुत संशोधनाकरिता निरीक्षण संशोधन पद्धतीचा अवलंब केला जाईल. त्याच प्रमाणे संशोधनाचे तंत्र म्हणून उल्लेख विश्लेषणाचा वापर केला जाईल.

नमुना निवड (Sample Method):-

सामाजिक शास्त्रातील एक अविभाज्य भाग म्हणून नमुना निवड पद्धतीचा उल्लेख केला जातो. विस्तृत समुहाचा लघु प्रतिनिधी म्हणजे नमुना निवड होय. अभ्यासाचे क्षेत्र व स्वरूप लक्षात घेऊन नमुना निवड केली जाते. नमुना निवड पद्धतीमुळे वेळ, श्रम, पैसा यांची बचत होत असते. वस्तुनिष्ठ पद्धतीमुळे व प्रातिनिधीक स्वरुपात नमुना म्हणून एककाची निवड केली जाते. प्रस्तुत संशोधनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथील मानव्यविद्याशाखे अंतर्गत येणारे दोन विषयाचा समावेश आहे. लोकप्रशासन व राजयशास्त्र या विषयांचा सादर पीएच. डी. प्रबंधाचा समावेश केला जाईल.

तथ्य संकलन (Data Collection):-

संशोधनासाठी तथ्य संकलन ही अनिवार्य बाब असते. संशोधन विषयाच्या अनुषंगाने तथ्य संकलित केली जातात. तथ्य संकलन करताना माहितीच्या प्राथमिक व द्वितीयक स्त्रोताचा यथोचित वापर केला जातो. या अनुषंगाने संशोधनाकरिता प्राथमिक व दुय्यम स्त्रोताचा वापर करता येतो. प्राथमिक स्त्रोताचा वापर करून अनेक लेख व प्रबंध यात त्याचा उपयोग होत असतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथील मानव्यविद्याशाखेतील लोकप्रशासन व राजयशास्त्र या विषयांचे सादर पीएच. डी. प्रबंधाचे निरीक्षण पद्धतीद्वारे तथ्य संकलन करण्यात येईल व दुय्यम

स्त्रोतामध्ये संदर्भ ग्रंथ , नियतकालिके, मासिके, वृत्तपत्र, इंटरनेट इत्यादीचा आधार घेतला जाईल.

संशोधन विषयाच्या अनुषंगाने तथ्य संकलन केली जातात. संशोधनासाठी तथ्य संकलन ही अनिवार्य बाब असते. तसेच तथ्य संकलन करताना माहितीच्या प्राथमिक व द्वितीय स्त्रोताचा पण या पद्धतीद्वारे तथ्य संकलन केले जाते.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा (Scope and limitation of Research):-

संशोधन करताना विशी निवडल्यावर त्या विषयाची व्याप्ती व मर्यादा निश्चित करावी लागत असते. तसेच संशोधन कोणत्या विषयापूरते मर्यादित आहे. तसेच कोणत्या क्षेत्र पुरते मर्यादित आहे. याचा पण उल्लेख करावा लागतो. या हेतूने प्रस्तुत संशोधन हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद या विद्यापीठा पुरते मर्यादित आहे. तसेच अनेक विद्याशाखेपैकी मानव्या (Humanitics) विद्याशाखे अंतर्गत सादर केलेल्या पीएच. डी. प्रबंधातील उल्लेख विश्लेषण करण्यात येणार आहे. तसेच 1 एप्रिल 2010 ते 31 मार्च 2020 या कालखंडातील प्रबंधाचा अभ्यास करण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधनात केवळ राज्यशास्त्र व लोकप्रशासन या विषयातील पीएच. डी. प्रबंधाचे उल्लेखसुची म्हणून अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण निहाय रचना :-

प्रकरण पहिले - प्रस्तावना

प्रकरण दुसरे - संदर्भ साहित्याचा आढावा

प्रकरण तिसरे - उल्लेख विश्लेषण व त्याचे महत्त्व

प्रकरण चौथे - तथ्यांचे विश्लेषण व अर्थविवेचन

प्रकरण पाचवे - सारांश व मार्गदर्शक सुचना

संदर्भ सुची:-

1. Abeyrthne, D. K. (2015), 'Citation Analysis of Dissertations for collection development', collection building, Vol. 34 No. 2.
2. वर्मा, आर. के. आणि वर्मा, गोपाल (1988), Methodology and Techniques of Research, आनंद प्रकाशन, न्यू दिल्ली.
3. थोरात, लक्ष्मण (2017), ग्रंथालय व महितीशास्त्र, डायमंड पब्लिकेशन, पुणे.
4. नरगुंदे, रेवती (2010), लेखन व महितीशास्त्र, जगन्नाथ प्रकाशन, पुणे.
5. निकोसे, सत्यप्रकाश (2007), ग्रंथालय आणि महितीशास्त्र संशोधन पद्धती, प्रज्ञा प्रकाशन, नागपुर.
6. Asha, B. (2007), 'Bibliometric properties of Demography India', Annals of Library and Information Studies, Vol. 54.

7. Busha, C. H. & Harter, S. P. (1980), Research Methods in Librarianship: Techniques and Interpretation, Academic Press, London.

8. Dhaliwal, K. & Tandon, D. (2014), 'Citation analysis of Theses submitted at the Gastroenterology department of the postgraduate Institute of Medical Education and Research', PEARL: A Journal of Library and Information Science, Vol. 8, No. 1.

संशोधक

प्रियंका दत्तरामजी निखाते

मार्गदर्शक

डॉ. एस. जी. क्षीरसागर

ग्रंथपाल

ग्रामीण महाविद्यालय वसंत नगर,

ता. मुखेड जि. नांदेड.